Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :– शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल 2022 उन्हाळी सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत (पारंपारिक अभ्यासक्रम पदवी प्रथम वर्ष वगळून)**

सर्व संबंधीतांना परिपत्रकान्वये अवगत करणेत येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या दि. 27 जून 2022 रोजी झालेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल 2022 उन्हाळी सत्रातील विद्यापीठ स्तरावरून आयोजित करण्यात येणा–या परीक्षेबाबत खालीलप्रमाणे जाहीर करणेत येत आहे.

1. विद्यापीठामार्फत घेतल्या जाणा–या शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑफलाईन (MCQ) पध्दतीने OMR तंत्रज्ञानाने प्रत्यक्ष केंद्रावर हजर राहून घेण्यात येतील.
2. सर्व परीक्षा ऑफलाईन (MCQ) पध्दतीने 50 गुणांची (25 प्रश्न प्रत्येकी 2 गुण), एक तास कालावधीची घेण्यात येईल.
3. डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस इत्यादी अधिविभाग/महाविद्यालय स्तरावर ऑफलाईन (MCQ) पध्दतीने घेण्यात येईल.
4. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक, Viva-Voce, Project इत्यादी कोविडपूर्व प्रचलित पध्दतीने घेण्यात यावेत.
5. दि. 25.04.2022 रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय हे ऑफलाईन लेखी Descriptive परीक्षेसाठी असल्याने त्यामधील सवलती ऑफलाईन (MCQ) पध्दतीने घेतल्या जाणा–या परीक्षेस देता येणार नसल्याने सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रश्नसंचिका/जादाची वेळ/दोन पेपर मधील अंतर इ. बाबींची मूभा असणार नाही याची नोंद घ्यावी.
6. यासंदर्भात वेळोवेळी प्राप्त होणा–या शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.
7. उपरोक्त परीक्षेच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात आलेले संदर्भ कं. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/156, दि.18/05/2022 व संदर्भ कं. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/224, दि. 23/06/2022 रददबातल समजण्यात यावे.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

डॉ. अजितसिंह जाधव
संचालक
(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)

जा. क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/235
दि. 28/06/2022

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
   सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष, दूरशिक्षण केंद्र – पुढील कार्यवाहीसाठी
4. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
5. समन्वयक इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
6. जनसंपर्क अधिकारी – प्रसिध्दीकरीता

Scanned with CamScanner